# महापालिकेत करभरणा, कामांच्या चौकशीस ॲप

## ‘ई-गव्हर्नन्स’ योजना : प्रमाणपत्रांच्या मागणीचाही मागोवा घेता येणार




**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ६ : स्मार्ट सिटीकडे वाटचाल करताना महापालिकेने नागरिकांसाठी वेगवेगळ्या प्रमाणपत्रांचा शोध घेण्यासाठी, केलेल्या तक्रारींचे काय झाले याची चौकशी करण्यासाठी किंवा मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी महापालिकेत अथवा वॉर्ड कार्यालयात खेटे घालण्याची गरज राहणार नाही अशी व्यवस्था केली आहे. गुगल प्ले स्टोअरवरून eMunicipality नावाचे ॲप नागरिकांची ही सर्व कामे सोपी करणार आहे.

औरंगाबाद शहराचा ‘स्मार्ट सिटी’त समावेश झाल्यानंतर तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात येत आहे. नागरिकांना कर भरण्याची सुविधा सहज उपलब्ध व्हावी यासाठी ॲन्ड्रॉईड मोबाईल फोनवरून ॲपच्या मदतीने करभरणा करता येणार आहे.

याशिवाय जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांचा, विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या कामाचा शोध या ॲपवरून घेता येणार आहे. महापालिकेच्या तक्रार निवारण प्रणालीद्वारे तक्रार नोंदवणे, यामध्ये सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, विद्युत विभाग, ड्रेनेज विभाग, उद्यान विभाग, बांधकाम विभाग जन्म-मृत्यू तसेच अतिक्रमणविषयक तक्रारी करता येतील. एवढेच नव्हे, तर आपण केलेल्या तक्रारींचे पुढे काय झाले, त्यांची सध्या काय स्थिती आहे याचीदेखील माहिती या ॲपच्या माध्यमातून मिळणार आहे.

### असे मिळवा ॲप

**गुगल प्लेस्टोअरमध्ये जाऊन eMunicipality या नावाने सर्च करून ॲन्ड्रॉईड ॲप मोबाईल फोनवर डाऊनलोड करून इन्स्टॉल करा. ॲप इन्स्टॉलेशनसाठी वापरकर्त्यांचे नाव व मोबाईल क्रमांकाचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी मोबाईलवरच रजिस्ट्रेशन फॉर्म भरता येईल. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर eMunicipality हे ॲप मोबाईलवर कार्यरत होईल.**